2185 निलंगा

ZPLAT-12017/3/2025-ZPLAT-VP I/1376283/2025

वाचा:- 1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961चे कलम 95 व 96(1)
2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961चे कलम 279
3) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम 1958 (1959 चा मुंबई अधिनियम क्रमांक 3) चे कलम 140
4) मा.मु.का.अ.जि.प.लातूर यांचे पत्र जा.क्र./जिपला/साप्रवी-2/ग्रापवि/कार्या-04/कावि-74/19 दि.30/03/2019
5) मा.मु.का.अ.जि.प.लातूर यांचे पत्र जा.क्र./जिपला/साप्रवी-2/ग्रापवि/कार्या-04/कावि-1101/22 दि.17/02/2022
6) मा.मु.का.अ.जि.प.लातूर यांचे पत्र जा.क्र./जिपला/साप्रवी-2/ग्रापवि/कार्या-04/कावि-298/23 दि.20/07/2023
7) मा.मु.का.अ.जि.प.लातूर यांचे पत्र जा.क्र./जिपला/साप्रवी-2/ग्रापवि/कार्या-04/कावि-119/24 दि.24/04/2024

---

जा.क्र./जिपला/साप्रवी-2/ग्रापवि/कार्या 04/कावि 301/25
सामान्य प्रशासन,पंचायत विभाग जिल्हा परिषद,लातूर
दिनांक 18/07/2025

आदेश

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 95 व 96(1) तसेच शासनाने वेळोवेळी मला दिलेल्या अधिकाराचा वापर करून वाचा क्र.1 व 2 अन्वये मला दिलेल्या अधिकारान्वये ग्रामपंचायत स्तरावरील स्थानिक लेखा निधी विभागाने ग्रामपंचायत स्तरावरील केलल्या लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले शक पुर्तता प्रकरणे निकाली काढण्यासाठी गटविकास अधिकारी यांना प्राप्त लेखा आक्षेपाचे वाचा क्र.3 अन्वये योग्य पडताळणी करून वगळणी बाबत अनुपालन सादर करण्यासाठी वेळोवेळी सुचना करण्यात आली होती.त्याच प्रमाणे वाचा क्र.4,5 व 6 अन्वये ग्रामपंचायत स्तरावरील प्रलंबित लेखा आक्षेप निकाली काढण्याच्या अनुषंगाने अनुपालन सादर करणे साठी पंचायत समिती स्तरावर कॅम्पचे आयोजन करून व वाचा क्र. 7 नुसार आपणास पडताळणी करून वगळनीचे अधिकार देऊन सुध्दा 10% अनुपालन सादर करण्यात आलेले नाहीत.त्यामुळे प्रलंबित लेखा आक्षेपाची संख्या वाढत आहे.

त्या अनुषंगाने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम 1958 चे कलम 140 नुसार मी या आदेशाद्वारे जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961चे कलम 95 व 96(1) तसेच शासनाने वेळोवेळी मला दिलेल्या अधिकाराचा वापर करून वाचा क्र.1 व 2 च्या अधिकारान्वये ग्रामपंचायत स्तरावरील स्थानिक लेखा निधी विभागाने ग्रामपंचायत स्तरावरील केलेल्या लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले शक पुर्तता प्रकरण निकाली काढण्यासाठी गटविकास अधिकारी यांना प्राप्त लेखा आक्षेपाचे वाचा क्र.3 अन्वये योग्य पडताळणी करून पुनश्च वगळणी बाबतचे अधिकार या द्वारे सोबत जोडलेल्या सहपत्रानुसार दि.31 मार्च 2026 पर्यंत शक्तीचे प्रत्यायोजन करण्यात येत आहे.

सदर अधिकाराचा वापर कायदा,नियम व शासन आदेश यांचे अधिन राहून करावयाचा आहे.यामध्ये कुठल्याही प्रकारे गैरप्रकार निदर्शनास आल्यास याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

सदर प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर न केल्यास संबधित अधिकारी हे जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी. सदर अधिकार कोणत्याहीवेळी व कोणत्याही कारणाने काढून घेण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात येत आहे.

सोबत-सहपत्र

स्वाक्षरीत
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,लातूर

प्रति,

1.मा.विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी नगर यांना माहितीस्तव सविनय सादर.
2.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,लातूर यांना माहितीस्तव.

3.मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद,लातूर यांना माहितीस्तव.

4.प्रकल्प संचालक,जि.ग्रा.वि.य.जिल्हा परिषद,लातूर यांना माहितीस्तव.

5.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सापवि) जिल्हा परिषद,लातूर यांना माहितीस्तव.

6.सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा,लातूर यांना माहितीस्तव.

7. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हा परिषद,लातूर यांना उचित कार्यवाहीस्तव.

8.गटविकास अधिकारी,पंचायत समिती --निलंगा------------यांना सदर प्रदान केलेल्या अधिकारा नुसार उचित कार्यवाही करणेसत्व विस्तार अधिकारी (पं) व स्थानिक ग्रा.प.सचिव याना आपले स्तरावरुन आदेशित करुन तात्काळ उचित कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास वेळोवेळी सादर करावा.

Signed by
Rahul Kumar Meena
Date: 18-07-2025 13:57:41
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,लातूर

जिल्हा परिषद,लातूर

जा.क्र./जिपला/सापवि-2 ग्रापवि/कार्या-04 कावि 301/25 जिल्हा परिषद,लातूर (ग्रामपंचायत विभाग) दिनांक 18/07/2025

प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा तपशिल

| अ.क्र. | प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचे स्वरुप | अधिकार कोणत्या पधिकारन्वये प्रदान करण्यात येत आहे | अधिकार कोणास प्रदान करण्यात येत आहेत | प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराची मर्यादा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | ग्रामपंचायत कडील ग्रामनिधी, जवाहर रोजगार योजना, जवाहर ग्राम समृद्धी योजना व अन्य योजना निधीच्या लेखा परीक्षणातील आक्षेपाच्या पुर्ततेस अंतिम मान्यता देणे.(विशेष लेखा परीक्षण आक्षेप वगळून ) | महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम,1961 चे कलम 96(1) अन्वये | गटविकास अधिकारी | पुर्ण अधिकार (दि.31.03.2026 पर्यंत) | पुर्ण अधिकार |

Signed by

Rahul Kumar Meena

मुख्य कार्यकारी अधिकारी

Date: 18-07-2025 13:57:19

जिल्हा परिषद,लातूर